# दुसरी अनुसूची

(कलम २४ पहा)

**केंद्र सरकारने स्थापन केलेल्या गुप्तवार्ता व सुरक्षा संघटना**

१. गुप्तवार्ता केंद्र
२. मंत्रिमंडळ सचिवालयाची संशोधन व विश्लेषण शाखा
३. महसूल गुप्तवार्ता संचालनालय
४. केंद्रीय आर्थिक गुप्तवार्ता विभाग
५. अंमलबजावणी संचालनालय
६. अंमली औषधिद्रव्य नियंत्रण विभाग
७. विमानचालन संशोधन केंद्र
८. विशेष सरहद्द दल
९. सीमा सुरक्षा दल
१०. केंद्रीय राखीव पोलीस दल
११. भारत-तिबेट सीमा पोलीस
१२. केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दल
१३. राष्ट्रीय सुरक्षा रक्षक
१४. आसाम रायफल
१५. विशेष सेवा विभाग
१६. विशेष शाखा (गुन्हे अन्वेषण विभाग) अंदमान व निकोबार
१७. गुन्हेशाखा - गुन्हे अन्वेषण विभाग - विशेष शाखा - दादरा आणि नगर हवेली
१८. विशेष शाखा, लक्षद्वीप पोलीस.

**डी. विश्वनाथन्,**
सचिव, भारत सरकार.

# महाराष्ट्र माहितीचा अधिकार नियम, २००५

**क्रमांक आर.टी.आय. २००५/सी.आर. ३१५/०५/५, दिनांक ११ ऑक्टोबर, २००५** - माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ (२००५ चा २२) च्या कलम २७ पोट-कलम (२) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासन पुढील नियम तयार करीत आहे.

**१. संक्षिप्त नाव आणि प्रारंभ** - (१) या नियमांना 'महाराष्ट्र माहितीचा अधिकार नियम, २००५' असे म्हणावे.

(२) ते दि. १२ ऑक्टोबर २००५ पासून अमलात येतील.

**२. व्याख्या** - या नियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर, -

(अ) 'अधिनियम' याचा अर्थ माहितीचे अधिकार अधिनियम, २००५ (२००५ चा २२);

(ब) 'कलम' याचा अर्थ वरील अधिनियमाचे कलम;

(क) या नियमात वापरलेले परंतु व्याख्या न केलेले शब्द आणि शब्दप्रयोग यांचे अधिनियमात अनुक्रमे जे अर्थ दिलेले असतील तेच अर्थ असतील.

**३. माहिती मिळविण्याची कार्यपद्धती** - कलम ६ च्या उपकलम १ अन्वये माहिती मिळविण्यासाठी जोडपत्र 'अ'मधील नमुन्यानुसार कोऱ्या कागदावर, संबंधित राज्य शासकीय माहिती अधिकाऱ्याकडे विनंती करावी लागेल आणि त्यासोबत योग्य त्या पावतीबद्दल रोख किंवा डिमांड ड्राफ्ट किंवा शासकीय प्राधिकरणास देय असणारा बँकेचा चेक किंवा न्यायालय शुल्क मुद्रांक चिकटावून, १० रुपये अर्जाचे शुल्क म्हणून जोडावे लागतील.

**४. माहितीचे शुल्क** - (१) कलम ७ च्या उपकलम (१) अन्वये माहिती पुरविण्यासाठी, योग्य त्या पावतीबद्दल रोख किंवा डिमांड ड्राफ्ट किंवा शासकीय प्राधिकरणास देय असलेला बँक चेक किंवा मनीऑर्डर अशा मार्गाने खालील दराने शुल्क आकारले जाईल.

| | |
|---|---|
| (अ) (१) संबंधित विभागाने दस्तऐवज नकाशे इत्यादीची किंमत आधीच ठरविली असेल तर | अशी आधीच ठरविलेली किंमत अधिक (+) टपालखर्च - |
| (२) जर माहिती छायांकित प्रत किंवा इतर (प्रतीच्या) मार्गाने तत्काळ उपलब्ध असेल तर | (१) तयार किंवा प्रत (नक्कल) केलेल्या प्रत्येक (A-4 किंवा A-3 आकाराच्या) पानासाठी दोन रु. अधिक टपालखर्च किंवा |

(२) मोठ्या आकाराच्या कागदाच्या प्रतीसाठी प्रत्यक्ष झालेला खर्च किंवा किंमत अधिक टपालखर्च

(ब) अभिलेखाच्या निरीक्षणासाठी पहिल्या एका तासासाठी कोणतेही शुल्क नाही आणि त्यापुढील प्रत्येक पंधरा मिनिटांसाठी (किंवा त्याच्या भागासाठी) ५ रुपये शुल्क असेल;
परंतु अर्जदार व्यक्तिशः माहिती स्वीकारणार असेल तर कोणताही टपालखर्च आकारला जाणार नाही.

(२) कलम ७ च्या उप-कलम (५) अन्वये पुरवावयाच्या माहितीसाठी योग्य त्या पावतीबद्दल रोख किंवा डिमांड ड्राफ्ट किंवा शासकीय प्राधिकरणास देय असलेला बँक चेक किंवा मनिऑर्डर अशा मार्गाने खालील दराने शुल्क आकारले जाईल :-

(अ) डिस्केट किंवा फ्लॉपीमधून माहिती पुरविण्यासाठी प्रत्येक डिस्केट किंवा फ्लॉपीसाठी ५० रु. अधिक टपाल खर्च आणि

(ब) छापील स्वरूपातील माहितीसाठी त्या प्रकाशनाची प्रत्यक्ष ठरविलेली किंमत किंवा त्या प्रकाशनातील उताऱ्यांच्या छायाप्रतीसाठी प्रत्येक पानास २ रु. अधिक टपाल खर्च :
परंतु अर्जदार व्यक्तिशः माहिती स्वीकारणार असेल तर कोणताही टपालखर्च आकारला जाणार नाही.

**५. अपील -** (१) कलम ७ च्या उप-कलम (१) किंवा (३) चा खंड (अ) मध्ये दिलेल्या मुदतीत एखाद्या व्यक्तीला निर्णय मिळाला नाही तर, किंवा राज्य शासकीय माहिती अधिकाऱ्याच्या आदेशामुळे व्यथित झाली तर अशी व्यक्ती, राज्य शासकीय माहिती अधिकाऱ्याचा आदेश मिळाल्यापासून तीस दिवसांच्या आत, जोडपत्र 'ब'मध्ये दिलेल्या नमुन्यामध्ये कोऱ्या कागदावर संबंधित अपील अधिकाऱ्यांकडे अपील दाखल करू शकेल, ज्यासोबत, योग्य पावतीच्या बद्दल रोख किंवा डिमांड ड्राफ्ट किंवा शासकीय प्राधिकरणास देय असणारा बँक चेक किंवा न्यायालय मुद्रांक शुल्क चिकटवून वीस रु.चे अपील शुल्क जोडावे लागेल आणि ज्याच्या विरुद्ध अपील असेल त्या आदेशाची प्रत जोडलेली असेल.

(२) कलम १९ च्या उप-कलम (१) अन्वये अपील अधिकाऱ्याच्या आदेशामुळे व्यथित कोणतीही व्यक्ती, अपील अधिकाऱ्याचा आदेश मिळाल्यापासून ९० दिवसांच्या आत, जोडपत्र 'क' मध्ये दिलेल्या नमुन्यामध्ये कोऱ्या कागदावर राज्य माहिती आयोगाकडे दुसरे अपील दाखल करू शकेल ज्यासोबत, योग्य पावतीच्या बद्दल रोख किंवा डिमांड ड्राफ्ट किंवा राज्य माहिती आयोगास देय असणारा बँक चेक किंवा न्यायालय मुद्रांक शुल्क चिकटवून वीस रु.चे अपील शुल्क जोडावे लागेल आणि ज्याच्या विरुद्ध अपील असेल त्या आदेशाची प्रत जोडलेली असेल.

# जोड पत्र अ

[पहा नियम (३)]

| |
|---|
| येथे रु. १० चा न्यायालय फी मुद्रांक चिकटवावा. |

## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये, अर्जाचा नमुना

प्रति

राज्य जन माहिती अधिकारी,
(कार्यालयाचे नाव व पत्ता)

(१) अर्जदाराचे संपूर्ण नाव :

(२) पत्ता :

(३) आवश्यक असलेल्या माहितीचा तपशील -

(एक) माहितीचा विषय* :

(दोन) माहितीशी संबंधित कालावधी # :

(तीन) आवश्यक असलेल्या माहितीचे वर्णन $ :

(चार) माहिती टपालाद्वारे किंवा व्यक्तिश :
आवश्यक आहे किंवा कसे :
(प्रत्यक्ष टपाल खर्च अतिरिक्त
शुल्कामध्ये समाविष्ट केला जाईल.)

(पाच) टपालाद्वारे असेल त्याबाबतीत :
(सर्वसाधारण, नोंदणीकृत किंवा शीघ्र)

(४) अर्जदार दारिद्र्य रेषेखाली आहे काय?
(असल्यास त्याबद्दलच्या पुराव्याची फोटो कॉपी सोबत जोडावी)

ठिकाण :

दिनांक : अर्जदाराची स्वाक्षरी.

---

* विषयाचा स्थूल प्रवर्ग दर्शविण्यात यावा (शासकीय जमीन देणे/सेवा बाबी/परवाने इत्यादी)

# ज्या कालावधी संबंधातील माहिती आवश्यक आहे तो कालावधी दर्शविणे.

$ माहितीचा विशेष तपशील दर्शविणे आवश्यक आहे.

# जोडपत्र ब

[पहा नियम ५(१)]

| |
|---|
| येथे रु. २० चा न्यायालय फी मुद्रांक चिकटवावा. |

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(१) नुसार करावयाचे अपील**

प्रेषक ..........................................................

(अर्जदाराचे नाव आणि पत्ता)

प्रति ..........................................................

(अपील प्राधिकाऱ्याचे नाव/पदनाम/पत्ता)

(१) अपीलकाराचे संपूर्ण नाव :

(२) पत्ता :

(३) राज्य जन माहिती अधिकाऱ्याचा तपशील :

(४) ज्या आदेशाच्या विरुद्ध अपील केले आहे तो आदेश मिळाल्याचा दिनांक :

(५) अपील दाखल करण्याचा अंतिम दिनांक :

(६) अपीलाची कारणे :

(७) माहितीचा तपशील :-

(एक) आवश्यक असलेल्या माहितीचे विषय आणि स्वरूप.

(दोन) माहिती ज्या कार्यालयाशी किंवा विभागाशी संबंधित आहे त्याचे नाव :

ठिकाण :

दिनांक :		अपीलकाराची स्वाक्षरी

## जोडपत्र क

[पहा नियम ५(२)]

येथे रु. २० चा
न्यायालय फी मुद्रांक
चिकटवावा.

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दुसरे अपील**

प्रेषक ....................................................................................

(अर्जदाराचे नाव आणि पत्ता)

प्रति ....................................................................

(१) अपीलकाराचे संपूर्ण नाव :

(२) पत्ता :

(३) राज्य जन माहिती अधिकाऱ्याचे तपशील :

(४) पहिल्या अपील अधिकाऱ्याचे तपशील :-

(५) ज्या आदेशाच्या विरुद्ध अपील केले आहे
तो आदेश मिळाल्याचा दिनांक :-

(६) अपील दाखल करण्याचा अंतिम दिनांक :-

(७) अपीलाची कारणे :-

(८) माहितीचा तपशील :-

(एक) आवश्यक असलेल्या माहितीचे विषय आणि स्वरूप :-

(दोन) माहिती ज्या कार्यालयाशी किंवा
विभागाशी संबंधित आहे त्याचे नाव :-

ठिकाण :

दिनांक : अपीलकाराची स्वाक्षरी

| अ. क्र. | राज्य माहिती आयुक्त कार्यालयाचे पूर्ण पत्ते |
|---|---|
| १ | २ |
| १. | **महाराष्ट्र राज्य मुख्य माहिती आयुक्त**<br>डॉ. श्री. सुरेश जोशी<br>नवीन प्रशासकीय इमारत, १३ वा मजला,<br>मंत्रालयासमोर, मुंबई-४०००३२<br>फोन (०२२) २२०४११८४/२२८५६०७८ |
| २. | **राज्य माहिती आयुक्त (मुंबई व मुंबई उपनगर विभाग)**<br>श्री. रामानंद तिवारी<br>नवीन प्रशासकीय इमारत, १३ वा मजला,<br>मंत्रालयासमोर, मुंबई-४०००३२<br>फोन (०२२) २२०४११८४/२२८५६०७८ |
| ३. | **राज्य माहिती आयुक्त (कोकण विभाग)**<br>श्री. नवीनकुमार<br>१ ला मजला, कोकणभवन, नवी मुंबई-४००६१४<br>फोन-(०२२) २७५७१३२४ |
| ४. | **राज्य माहिती आयुक्त (पुणे विभाग)**<br>श्री. विजय कुवळेकर<br>४ था मजला, नवीन प्रशासकीय इमारत,<br>कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१<br>फोन-(०२०) २६०५०६३३/२६०५०५८० |
| ५. | **राज्य माहिती आयुक्त (औरंगाबाद/नाशिक विभाग)**<br>श्री. विजय बाबूराव बोरगे<br>सुभेदारी गेस्ट हाऊस, विभागीय आयुक्त<br>कार्यालयाजवळ, औरंगाबाद -४३१ ००१<br>फोन (०२४०) २३५२५४४<br>फॅक्स २३५२१३३ |
| ६. | **राज्य माहिती आयुक्त (नागपूर/अमरावती विभाग)**<br>श्री. विलास भागवत पाटील<br>रवीभवन, दालन क्र. १७, नागपूर<br>फोन : (०७१२) २५६६८१६<br><br>**वेबसाईट**<br>www.maharashtra.gov.in<br>sic.maharashtra.gov.in |

| अ. क्र. | केंद्रीय माहिती आयुक्त कार्यालयाचे पूर्ण पत्ते | अ. क्र. | केंद्रीय माहिती आयुक्त कार्यालयाचे पूर्ण पत्ते |
|---|---|---|---|
| १ | २ | १ | २ |
| १. | **वजाहत हबीबुल्लाह**<br>मुख्य माहिती आयुक्त<br>मध्यवर्ती माहिती कार्यालय<br>३०६, २रा मजला,<br>ऑगस्ट क्रांती भवन,<br>भिकाजी कामा पॅलेस<br>न्यू दिल्ली ११००६६<br>फोन (०११) २६७१७३५५<br>Email: whabibullah@nic.in | ५. | **सौ. अन्नपूर्णा दीक्षित**<br>माहिती आयुक्त<br>रुम नं. ६, क्लब बिल्डींग<br>जुना जेएनयू कॅंपस<br>न्यू दिल्ली ११००६७<br>फोन-२६१६११९७<br>Email: adixit@hic.in |
| २. | **तिवारी अनुग्रह नारायण (ए.एन.)**<br>माहिती आयुक्त<br>मध्यवर्ती माहिती कार्यालय<br>५ वा मजला, ब्लॉक ५,<br>जेएनयू कॅंपस, न्यू दिल्ली ११००६७<br>टेलिफॅक्स २६१६७९३१<br>Email: antiwari@nic.in | ६. | **श्री सत्यानंदा मिश्रा**<br>माहिती आयुक्त |
| ३. | **डॉ. ओमप्रकाश केजरीवाल**<br>मध्यवर्ती माहिती कार्यालय<br>१५वा मजला, ब्लॉक ५,<br>जुना जेएनयू कॅंपस<br>न्यू दिल्ली ११००६७<br>फोन-२६७१७३५१<br>Email: okejariwal@niv.in | ७. | **श्री. एम. एल. शर्मा**<br>माहिती आयुक्त<br>रुम नं.३०८, दुसरा मजला,<br>ऑगस्ट क्रांती भवन<br>भिकाजी कामा पॅलेस<br>न्यू दिल्ली ११००६६<br>फोन-२६१६२६६२<br>Email: sharma.ml@nic.in |
| ४. | **प्रोफेसर एम.एम. अन्सारी**<br>माहिती आयुक्त<br>मध्यवर्ती माहिती कार्यालय<br>२रा मजला, ऑगस्ट क्रांती भवन<br>भिकाजी कामा पॅलेस<br>न्यू दिल्ली ११००६६<br>फोन-२६७१७३५१<br>Email: mm.ansari@nic.in | ८. | **श्री. शैलेश गांधी**<br>माहिती आयुक्त<br>रुम नं. ४१५, ४ था मजला,<br>ब्लॉक नं. ४,<br>जुना जेएनयू कॅंपस<br>न्यू दिल्ली ११००६७<br>न्यू दिल्ली ११००६६<br>फोन-२६१६१७९६<br>Email: mm.ansari@nic.in |